जिल्हा उद्योग केंद्र नांदेड.
उद्योग भवन पहिला मजला, कै.रामगोपाल गुप्ता औद्यो.सहकारी वसाहत ,
शिवाजीनगर, नांदेड . पिन- 431602, (02462)(250056) 255696
E-Mail : didicnanded@maharashtra.gov.in Website : www.nandeddic.in

# टिपणी

दिनांक २८/१०/२०२०

विषय :- महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद अंतर्गत जिल्हा निर्यात समिती गठीत करण्याबाबत
संदर्भ :- शासन निर्णय क्र.निप्रप-2020/प्र.क्र.२८/उदयोग-७ ,मुंबई-32 दिनांक १९ ऑक्टोंबर २०२०

सादर

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार राज्यातील लघू व मध्यम उदयोगांना आंतरराष्टीय व्यापारामध्ये सहाय्य करण्यासाठी तसेच राज्यातील संभाव्य निर्यात क्षमता असलेल्या विविध क्षेत्रामधून निर्यातवृध्दी होण्यासाठी आणि निर्यातदारांमध्ये जागरूकता आणून त्यांना स्पर्धात्मक बनविण्यासाठी तसेच राज्यातील निर्यातीला चालना देण्याचे दृष्टीने तसेच उदयोगांना येणा-या अडचणी सोडविण्यासाठी राज्यात महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषदची स्थापना करण्यात आली आहे.

जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये ,आदयौगिक संघटना,निर्यात परिषदा , निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा,सम-वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी शासन निर्णयामधील मुददा क्र. ५ नुसार प्रत्येक जिल्हयात मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची" समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | विदेश व्यापार महानिदेशालय (Director General of Foreign Trade)चे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | जिल्हा वस्तू व सेवा कर अधिकारी | सदस्य |
| ४ | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक | सदस्य |
| ५ | जिल्हयातील दोन महत्वाच्या निर्यात प्रचालन परिषदेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | जिल्हयातील दोन महत्वाच्या औदयोगिक संघटनांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | नाबार्ड/अॅपेडाचे अधिकारी | सदस्य |
| ८ | संचालक,सुक्ष्म,लघू व मध्यम उपक्रम यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र औदयोगिक विकास | सदस्य |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | महामंडळ | |
| १० | आवश्यकतेनुसार विविध जिल्हा स्तरीय अधिकारी/निर्यातदार/सल्लागार/औदोगिक संघटना | निमंत्रित सदस्य |
| ११ | महाव्यवस्थापक,जिल्हा उदयोग केंद्र (Convener) | सचिव |

समितीमध्ये अ. क्र. ६ मध्ये जिल्हयातील दोन महत्वाच्या औदयोगिक संघटनांचे प्रतिनिधी म्हणून श्री.-,अध्यक्ष .कृष्णूर औद्योगिक संघटना, नांदेड. व श्री.-,अध्यक्ष, लघु उद्योजक संघटना, नांदेड. यांची सदस्य म्हणून तर अ. क्र. १० मध्ये जिल्हा स्तरीय अधिकारी/निर्यातदार/सल्लागार/औदोगिक संघटनांचे प्रतिनिधी म्हणून श्री. नीलेश देशमुख,शंबूनाथ ट्रेडिंग एजन्सी अर्धापूर . श्री सुशील सदानंद मेडेवर, श्रीनिवासा पल्सेस, सिडको नांदेड.यांची निमंत्रित सदस्य म्हणून नेमणूक करावी असे वाटते.

तेव्हा सदर स्थापित समितीला व समितीमध्ये नामनिर्देशित केलेल्या सदस्यांना मंजूरात मिळणेबाबत टिपणी सविनय सादर.

महाव्यवस्थापक
जिल्हा उदयोग केंद्र, नांदेड..

मा.जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष , जिल्हा निर्यात प्रचालन परिषद,
नांदेड.

Scanned with OKEN Scanner